# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१६) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक १०/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१६) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०५. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०७. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०९. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१२. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : फायर एनओसी बाबत बऱ्याच बैठकी पासुन चर्चा होऊन खुलासा मिळालेला नाही.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : याबाबत वेळो वेळी सुचना देण्यात आली होती माहीती का देत नाही.

प्र.अग्नीशामन अधि : आज चार वाजे पर्यंत सविस्तर माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : ताबडतोब आजच्या आज चार वाजे पर्यंत पुर्ण माहिती स.सदस्यांना द्यावी

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : त्रिमुर्ती चौक मार्केटमध्ये सुलभ शौचालय बाबत मागच्या बैठकीत आदेश देण्यात आले होते. तेथील काम अजुन सुध्दा चालु झाले नाही.

मा.सभापती : श्री.अफसर सिद्दिकी हे गैरहजर आहे. जे जे अधिकारी गैरहजर असतील त्यांना नोटीस देऊन त्याची कॉफी सभापतीना देण्यात यावी.

कार्य.अभि.(ड्रेनेज) : योग्य ती माहिती घेऊन संध्याकाळ पर्यंत स.सदस्यांना कळवतो.

मा.सभापती : ते शौचालय चालु कसे होईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : ज्या एजन्सी मार्फत हे काम करण्यात येते त्या एजन्सीला काय अटी शर्ती ठरवुन दिल्या आहेत त्याची सुध्दा माहिती सभागृहात देण्यात यावी.

श्रीमती.शेख नरगीस : श्री.केंद्रे मुख्यलेखाधिकारी यांना निलंबित करण्यासाठी काय कार्यवाही केली आहे?

श्री.गजानन बारवाल : कॉन्ट्रॅक्टरचे रस्त्याच्या बिलाचे पेमेंट झाले त्याबाबत चौकशी चे आदेश देण्यात आले होते. त्या चौकशीचा अहवालाचे काय झाले त्या प्रकरणात श्री.संजय पवार आणि श्री.मेहेर हे सुध्दा तेवढेच दोषी आहेत असे माझे मत आहे.

श्री.शेख नरगीस : श्री.केंद्रे यांना एक महिन्या अगोदर पत्र दिले होते, आज दिड महिना झाला आहे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

अतिरिक्त आयुक्त : या चार पाच मुद्यांवर लेखा विभागातुन माहिती मागवलेली आहे. त्यावर चौकशी होईल.

मा.सभापती : मागच्या बैठकीत स्पष्ट सुचना प्रशासनाला देण्यात आली होती की, श्री.केंद्रे यांना निलंबित करा. चौकशी वगैरे होत राहील आधी निलंबनाची कारवाई करा. दोन दिवसात प्रशासनाने निर्णयाची अमलबजावणी जर केली नाही तर तीसऱ्या दिवशी मा.मुख्यमंत्री आणि सचिवांना लेखी स्वरुपात तक्रार केली जाईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : एक वर्षापासुन रेल्वेस्टेशन येथील पेट्रोल पंप हटवण्याबाबत बोलत आहे. त्यावर काय कार्यवाही झाली.

सहा.संचालक (न.र) : भुसंपादनाच्या पेमेंटसाठी फाईल अकाऊंट विभागात पाठवलेली आहे. पेमेंट अदर केल्या नंतर कार्यवाही होईल.

मा.सभापती : अकाउंट विभागातुन आजच्या आज फाईल मा.आयुक्तांकडे पाठवावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : बीड बाय पास रोडवरील अतिक्रमणाचा विषय होत त्याचे काय झाले. त्या रस्त्यावरील टप्पऱ्या काढण्यात यावे.

सहा.संचालक (न.र) : कमलनयन हॉस्पिटल जवळील टप्पऱ्या काढण्यात आल्या आहे.

मा.सभापती : मा.न्यायालयाच्या निर्णय येईल तो येईल त्याची वाट न बघता रस्त्यावरील सर्व टप्पऱ्या काढण्यात याव्या.

श्री.सिध्दांत शिरसाट : रेल्वेस्टेशन एमटीडीसी जवळ डीपी रोडचे सुध्दा कागदपत्र दिले होते. तेथील अतिक्रमणाचे काय झाले.

मा.सभापती : एका घरामुळे बाकीच्या लोकांना त्रास होत असेल तर ते काढण्यासाठी काय हरकत आहे. परवाच्या दिवशी मी स्वतः पाहणीसाठी येतो. अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : १ सप्टेंबर रोजी होडिंग संदर्भात अभय योजना राबवण्यात आली होती. महानगरपालिकेच्या अधिकृत होर्डिंग्स्ला नंबरीग केलेली आहे. असे सांगतात परंतु शहरामध्ये काही होर्डिंग्स्ला नंबरीग केलेली दिसत नाही. सभागृहात चूकीची माहिती देतात.

मालमत्ता अधिकारी : महानगरपालिकेतर्फे ४८८ होर्डिंग्स्ला नंबरीग केलेली आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : एकाही होर्डिंग्स्ला नंबरींग केलेली नाही.

मा.सभापती : तुमच्या विभागामध्ये कोण हे काम बघत आहे त्यांना फोन करुन बोलवा.

मालमत्ता अधिकारी : शहरामध्ये ४४८ होर्डिंग्स्ला नंबर टाकलेले आहे.

मा.सभापती : कोण कोणत्या भागामध्ये नंबरीग केली आहे. माहीती द्यावी.

मालमत्ता अधिकारी : त्यामध्ये क्रांती चौक, बस स्टँड, बाबा पेट्रोल पंप अशा बऱ्याच भागांमधील होर्डिंग्स्ला नंबरीग केलेल्या आहेत. १०० अधिकृत होर्डिंग्स्ला नंबरीग केलेली आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अभय योजना राबवल्यापासुन किती होर्डिंग्स् नियमित करुन घेतल्या आहेत.

मा.सभापती : किती होर्डिंग्स्ला लिगली करुन घेतले आहे.

मालमत्ता अधिकारी : तसे होर्डिंग्स् बाबत प्रस्ताव आलेले नाहीत.

मा.सभापती : प्रस्ताव आले नाहीत तर कारवाई का केली नाही. त्या संचिका माझ्याकडे द्यावी. श्रीमती.करपे मॅडम ज्या काही होर्डिंग्स् बाबत स.सदस्यांच्या सुचना आहेत त्याची पुर्ण नोंद करुन घ्यावी.

श्रीमती.स्वाती नागरे : सर्व सामान्य महिलां बचत गटाचे टेंडर कोणीच घेत नाही.

अतिरिक्त आयुक्त : सवलतीच्या दरात कर्ज वाटप केले जाते.

श्रीमती.स्वाती नागरे : तीन वर्षापासुन बचत गटासाठी सायकल, पिठाची गिरणी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. एक सुध्दा काम झालेले नाही.

मा.सभापती : पुढच्या बैठकी पर्यंत सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्रीमती.शेख नसरीन : कोहिनुर कॉलनीतील हॉलचे अजुन सुध्दा काम करण्यात आलेले नाही.

श्री.गजानन बारवाल : मागच्या तीन बैठकी पासुन यावर चर्चा चालु आहे.

मा.सभापती : कोहिनुर कॉलनीच्या विषयामध्ये स्वतः मा.आयुक्तांशी चर्चा करतो. योग्य मार्ग काढायला सांगतो.

श्री.ऋषिकेश खैरे : वार्डामध्ये किती लाईट बसवण्यात आले आहे याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्युत) : वार्डामध्ये पाहणी करण्यात आलेली आहे. आजच एलईडी कंपनीची गाडी पाठवण्यात आली आहे.

श्री.ऋषिकेश खैरे : पी.ए ला फोन लावला त्यांनी सांगितले की, गाडीमध्ये मटेरियल नाही.

कार्य.अभियंता(विद्युत) : काही तांत्रिक अडचण झाली असेल मी स्वतः जाऊन बघतो.
मा.सभापती : यामध्ये जे काही आवश्यक असेल ते करण्यात यावे.
श्री.सिध्दांत शिरसाट : पाणी पुरवठाच्या वाटाघाटीची संचिका कुठे आहे याची माहिती नाही.
मा.सभापती : पाणी पुरवठा विभागाच्या संचिकेवर काय निर्णय केला खुलासा करावा.
कार्य.अभियंता(पा.पु) : वाटाघाटीच्या बऱ्याच संचिका मंजुर होऊन वर्कऑडर झाल्या आहेत.

**विषय क्र. १४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-१९ च्या प्रथम सत्रात दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील रितसर प्रक्रियेने भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | घ. तासिका त.मा.शिक्षकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल तासिका |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती तेहरीम शे. बाबर | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| २. | मा. वि. बनेवाडी | श्री. संघवी रविंद्रकुमार जिनदास | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| ३. | मा.वि. हर्सुल | श्री. हिरेकर सुनिल दौलतराव | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| ४. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्रीमती शे.मावीया तबस्सुम शे. नजमुद्दिन | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| ५. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्रीमती सय्यदा शाहीन अंजुम तौफिक अली | बी.ए .बी.एड . | इतिहास सा. शास्त्रे | ७२ तास |
| ६. | मा.वि.हर्सुल | श्रीमती पवार किरण भारत | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| ७. | मा.वि.सिडको एन-७ | श्रीमती राठोड मंजूश्री गणपतराव | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| ८. | मा.वि.सिडको एन-७ | श्रीमती देशमुख वैशाली दिनकर | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| ९. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्री.उमेश अशोक गायकवाड | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| १०. | मा.वि.नारेगाव मराठी | श्रीमती पाटील वैशाली कैलास | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| ११. | मा. वि.चिकलठाणा | श्री.पठाण जाहेद खान साहेब खान | बी.ए.बी.एड . | हिंदी | ७२ तास |
| १२. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती ढोबळे राखी राम | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १३. | मा.वि. चिकलठाणा | श्रीमती मनिषा बळीराम शिंदे | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| १४. | मा.वि.हर्सुल | श्रीमती कुऱ्हाडे सुमन संतोष | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १५. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती चौधरी संगीता लक्ष्मण | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| १६. | मा.वि.बन्सीलालनगर | श्री. काकडे राहिदास मुरलीधर | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १७. | मा.वि.मिटमिटा | श्री.नन्नावरी श्रीकांत सोमकांत | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १८. | मा.वि.बनेवाडी | श्री. उन्हाळे प्रकाश भगवान | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| १९. | मा.वि.बनेवाडी | श्री. भुतेकर भाग्येश्वर श्रीकिशन | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| २०. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती वामन सरीता रामकृष्ण | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| २१. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती जंजाळ उज्वला परसराम | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| २२. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती रेखा दशरथ महाजन | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही,याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात शिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशाने दि.०५/०६/२०१८ ते दि.१४/०६/२०१८ आणि दि.१३/११/२०१८ ते दि.२४/११/२०१८ पर्यंत इयत्ता १० वी च्या वर्गाच्या प्रत्येकी दररोज एक घडयाळी तासिका घेणे बाबत आदेशित करण्यात आले होते.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील व्दितीय सत्रात दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच उपरोक्त कालावधीतील मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.१४१-१४२ यामध्ये काही अटी असतील तर दुरुस्तीसह विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या प्रस्तावित प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २२ घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात शिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशाने दि.०५/०६/२०१८ ते दि.१४/०६/२०१८ आणि दि.१३/११/२०१८ ते दि.२४/११/२०१८ पर्यंत इयत्ता १० वी च्या वर्गाच्या प्रत्येकी दररोज एक घडयाळी तासिका घेणे बाबत आदेशित करण्यात आले होते, सदर कालावधीतील मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच वरील अ.क्र.०१ ते २२ कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील व्दितीय सत्रात दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरूप भरती केलेल्या घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-१९ च्या प्रथम सत्रात दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंत दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील काळानुरूप भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | तासिका त.मा.शिक्षकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल तासिका |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती सुलाखे निलीमा | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| २. | मा.वि.मिटमिटा | श्री. म्हस्के दिनेश जगन्नाथ | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| ३. | मा.वि.मिटमिटा | श्रीमती खरात नीता मोतीराम | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| ४. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्री. खान शहेबाज खुदायार खान | एम.ए.बी.एड . | उर्दु | ७२ तास |
| ५. | मा.वि. नारेगाव उर्दु | श्री. शेख जफर | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास |
| ६. | मा.वि.शाहबाजार | श्रीमती पटेल हुमैरा अ.बारी | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| ७. | मा.वि.सिडको एन-७ | श्री. जाधव व्यंकट भिमराव | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| ८. | मा.वि. नारेगाव मराठी | श्री. श्रीकांत किसनराव शिंदे | एम.एस्सी.बी.एड | विज्ञान | ७२ तास |

| | | | . | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | मा.वि.नारेगाव मराठी | श्री. मिर्झा अजमल बेग | एम.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| १०. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती सुरेखा द. आक्षे | बी.एस्सी.बी.एड | विज्ञान | ७२ तास |
| ११. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| १२. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री. इंगळे प्रकाश विष्णु | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| १३. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव | बी.ए.बी.एड . | हिंदी | ७२ तास |
| १४. | मा.वि.बन्सीलालनगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| १५. | मा.वि.बन्सीलालनगर | श्रीमती भडके ताई नारायण | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| १६. | मा.वि.नारेगाव मराठी | श्रीमती फुलंब्रीकर अरुणा प्रभाकर | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १७. | मा.वि.बनेवाडी | श्री. सोनवणे राजेंद्र कडुबा | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास |
| १८. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव | एम.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| १९. | मा.वि.हर्सुल | श्री. संजय शंकर मोकळे | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास |
| २०. | मा.वि.हर्सुल | श्रीमती भिलेगावकर प्रेरणा | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |
| २१. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास |

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही,याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षांतील प्रथम सत्रात शिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशाने दि.०५/०६/२०१८ ते दि.१४/०६/२०१८ आणि दि. १३/११/२०१८ ते दि.२४/११/२०१८ पर्यंत इयत्ता १० वी च्या वर्गाच्या प्रत्येकी दररोज एक घडयाळी तासिका घेणे बाबत आदेशित करण्यात आले होते.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील व्दितीय सत्रात दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच उपरोक्त कालावधीतील मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरूप भरती केलेल्या प्रस्तावित प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २१ घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षांतील प्रथम सत्रात शिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशाने दि.०५/०६/२०१८ ते दि.१४/०६/२०१८ आणि दि.१३/११/२०१८ ते दि.२४/११/२०१८ पर्यंत इयत्ता १० वी च्या वर्गाच्या प्रत्येकी दररोज एक घडयाळी तासिका घेणे बाबत आदेशित करण्यात आले होते, सदर कालावधीतील मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच वरील अ.क्र.०१ ते २१ कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील व्दितीय सत्रात दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक २६/११/२०१८ ते उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३ :**

विषय : वार्ड क्र.१०१ फुलेनगर, एकनाथनगर भागातील वितरणात सुधारणा करण्यासाठी ३०० मीमी व्यासाची मुख्य जलवाहीनी तळेकर यांचे घरापासून आनंद गाडे चौक दरम्यान टाकणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| २ | कामाचे स्वरुप | पाणी पुरवठा सुरळीत करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | --- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये २४,९७,९३४/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०७/०९/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.शेख कन्स्ट्रक्शन | २४,९७,९३४/- | २४.७० टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | २०१७-१८ पाणी पुरवठा भांडवली कामे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही. |

तरी विषयांकित काम सक्षम ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७० टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. तरी सक्षम ठेकेदार मे.शेख कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७० टक्के जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये ३१,१४,९२४/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : माझ्या वार्डातील पदमपुऱ्याची १५ लाखाची फाईल मंजुर होत नाही. दोन लाखाची फाईल पेंडींग आहे. मंजुर होत नाही.

मा.सभापती : पाणी पुरवठ्याची आवश्यक कामे आहेत. लेखा विभागास सूचना की, पाणी पुरवठ्याच्या संचिका थांबणार नाही याची काळजी घ्यावी. विषय क्र.१४३ मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०१ फुलेनगर, एकनाथनगर भागातील वितरणात सुधारणा करण्यासाठी ३०० मीमी व्यासाची मुख्य जलवाहीनी तळेकर यांचे घरापासून आनंद गाडे चौक दरम्यान टाकणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७० टक्के जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये ३१,१४,९२४/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४ :**

विषय : प्रभाग क्र.७०, पदमपुरा अंतर्गत मोच्ची मोहल्ला ते रेल्वेस्टेशन राम मंदिर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे कॉंकेटींग करणे या कामाचे ठेकेदार मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.१,१३,८८,९०३/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.२५/०४/२०१८

महोदय,

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | १,१९,६९,९७०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | १,१६,२१,३३०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १७ एप्रिल २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २५ एप्रिल २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | १,१५,६३,२२४/- | अं.प. दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | एल-१ कंत्राटदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांनी अं.प. दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराची निविदा सादर केली आहे. निविदा समिती समोर दर निश्चितीअंती अं.प. दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने निविदा समितीने मान्यता दिली आहे. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.सर्वसाधारण सभा दि.३०/०१/२०१८ विषय क्र.२६२ |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.१,१३,८८,९०३/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.१४४ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७०, पदमपुरा अंतर्गत मोच्ची मोहल्ला ते रेल्वेस्टेशन राम मंदिर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे कॉंकेटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.१,१३,८८,९०३/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५ :**

विषय :- संत एकनाथ रंगमंदिर येथे केंद्रीय वातानुकूलन (Central Air Conditioner System) यंत्रणा उभारणे व स्थापीत करणे या कामाचे ठेकेदार HIVER AIRCON Ltd., Mumbai यांच्याकडून अंदाजपत्रक दरापेक्षा २०.०० टक्के जास्त दराने एकूण रक्कम रू.२,०८,४४७७२/- चे काम करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2018_AMCA_342946_5

महोदय,

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विद्युत विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | संत एकनाथ रंगमंदिर येथे वातानुकूलन यंत्रणा उभारणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, र.रू.१,७३,७०,६४३/- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.६२६ दिनांक ०६/०८/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | १,७३,७०,६४३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकमत,दै.सामना, दै.लोकविजय, दि.११/०९/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.१५/१०/२०१८ (तिसरी वेळ) |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.१७/१०/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | HIVER AIRCON PVT.LTD., MUMBAI | २,१०,०६१००.०० | २०.९२८७% जास्त |
| ०२. | ACCURATE ENGINEERS, NEW DELHI. | २,३१,०७१००.०० | ३३.०२३८% जास्त |
| ०३. | GENIUS AIRCON PVT. LTD., BENGALURU. | २,५२,२९०००.०० | ४५.२३९२% जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | --- |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | संत एकनाथ रंगमंदिर बंद पडलेले आहे. सदर A.C. च्या कामामुळे इतर कामे दखील थांबलेली आहेत. या कामासाठी कलाकाराचा सातत्याने पाठपुरावा आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | स्पर्धात्मक ३ निविदा दर प्राप्त आहेत. समितीने केलेल्या वाटाघाटी अन्वये L-1 कंत्राटदार दर कमी करण्यास तयार नाही आणि काम करून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर दर हे जी.एस.टी. सहीत आहेत. |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | संत एकनाथ रंगमंदिर देखभाल दुरूस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

सदरील काम हे बी-२ नमुन्यातील आहे. त्यामुळे अंदाजपत्रकात समाविष्ट प्रत्येक बाबींचा दर हा निविदाकाराने स्वतंत्र नमुद केलेला आहे. बाबनिहाय सर्व बाबींचे ऑफर केलेल्या दरानुसार येणाऱ्या रक्कमेची एकत्रीत बेरीज करून एकूण रक्कमेवर टक्केवारी काढण्यात आली आहे. या कामामूळे इतर कामे देखील थांबलेली असल्यामुळे हे काम तातडीने करणे आवश्यक आहे.

करीता प्राप्त निविदापैकी एल-१ कंत्राटदार HIVER AIRCON Ltd., Mumbai यांनी ऑफर केलेल्या २०.९२८७% जास्त दराऐवजी २०% जास्त दरास मंजुरीची शिफारस करण्यात आली असून कंत्राटदाराने त्यांचे पत्र दि.०३/१२/२०१८ अन्वये २०% जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२,०८,४४७७२/- या रक्कमेत काम करण्याची संमती दर्शविली आहे. करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : सहा महिन्यापासून हा विषय चालू आहे.

मा.सभापती : या कामाला एवढा उशीर का झाला.

कार्य.अभि. (श्री.खमर) : ए.सी. च्या कामाची मागील चार महिन्यापूर्वी निविदा काढली होती. आधी दोन वेळेस निविदा काढल्यावर सुध्दा प्रतिसादर मिळालेला नाही. पाच वेळेस निविदा काढलेल्या आहे, म्हणुन बराच वेळ यामध्ये गेला. संत एकनाथ रंगमंदिराचे विद्युतीकरणाचे अंदाजपत्रक तयार आहे.

मा.सभापती : त्याची निविदा का निघाली नाही.

कार्य.अभि. (श्री.खमर) : त्यामध्ये पूर्ण बजेट उपलब्ध नाही. ५१ लाखांचे अंदाजपत्रक आहे. लेखा विभागाला संचिका पाठविलेली होती, त्याचा अभिप्राय घेऊन मंजूरी घेतो. याचा पाठपुरावा चालू आहे. आजच्या आज ते होऊन जाईल.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : या कामासाठी वेळ ठरवण्यात यावा.

मा.सभापती : दोन दिवसात निविदा निघायला पाहीजे. विषय क्र.१४५ मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर येथे केंद्रीय वातानुकूलन (Central Air Conditioner System) यंत्रणा उभारणे व स्थापीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार HIVER AIRCON Ltd., Mumbai यांनी ऑफर केलेल्या २०.९२८७% जास्त दराऐवजी २०% जास्त दरास मंजुरीची शिफारस करण्यात आली असून कंत्राटदाराने त्यांचे पत्र दि.०३/१२/२०१८ अन्वये २०% जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२,०८,४४७७२/- या रक्कमेत काम करण्याची संमती दर्शविल्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रक दरापेक्षा २०.०० टक्के जास्त दराने म्हणजेच र.रू.२,०८,४४७७२/- पर्यंत सदरील काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४६ :</u>**

विषय : घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मो.कांचनवाडी येथे बायोमिथेनेशन केंद्र उभारण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.-२०१८- AMCA_328625_2 सन २०१८-१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | घनकचरा प्रक्रीया अंतर्गत मौ.कांचनवाडी येथे ३० टन प्रति दिवस क्षमतेचे बायोमिथेनेशन केंद्र उभारणे, चाचणी देणे, व १० वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,एकत्रित डीपीआर र.रू.९१.७९५ कोटी, मान्यता दि.०२/०४/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | एजन्सीकडून देकार दर स्वरूपात |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रे मराठी ०२, राज्यस्तरीय वर्तमानपत्रे मराठी ०२, इंग्रजी ०२ आणि हिंदी ०१, राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे इंग्रजी ०२, हिंदी ०२ तसेच ई-टेंडर विभाग |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०६/०९/२०१८ ते १९/०९/२०१८ (दुसरी वेळ) |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २१/०९/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | रू.११,९०,००,०००/- | First Lowest |
| ०२. | मे.रूद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. | रू.१८,५०,००,०००/- | Second Lowest |
| ०३. | मे.जैन ॲन्ड राय कन्स्ट्रक्शन कं. | रू.२१,५०,००,०००/- | Third Lowest |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागु नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मंजुर डीपीआर नुसार शासकीय अनुदान |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | --- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

विषयाकिंत कामासाठी ठेकेदार मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी बी-२ स्वरूपातील र.रूपये ११,९०,००,०००/- रकमेची अंदाजपत्रकीय दराची निविदा दाखल केली आहे.

तरी सदरील काम मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि., कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच र.रू.११,९०,००,०००/- चे काम करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : पाहिजे त्या प्रमाणात कचरा व्यवस्थापन करू शकलेलो नाही. नऊ ठिकाणी मशिन बसविण्याची मंजूरी दिली असतांना आतापर्यंत किती ठिकाणी बसविण्यात आल्या.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : रमानगरमध्ये शेडच्या कामाचे काय झाले.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

घनकचरा व्यवस्थापक : डी सेंट्रलाईजच्या ज्या मशिन आहेत त्यापैकी दोन मशिन चिकलठाणा येथे बसविण्यात आलेल्या आहेत. रमानगरला जे शेड आहे, त्यासाठी डीपीआर मधुन खर्च करण्याची तरतुद नाही. ते महानगरपालिकेच्या फंडामधुन करायचे आहे. हर्सुलला शेड पूर्ण झाले, तेथे दोन मशिन बसविण्यात आल्या आहे.

मा.सभापती : रमानगर शेडसाठी काय कार्यवाही करणार आहे.

घनकचरा व्यवस्थापक : रमानगर शेडसाठी जे अंदाजपत्रक अंतीम झाले होते, ते शिफ्ट करण्यात आले आहे.

मा.सभापती : ज्या नऊ मशिन बसविण्याचे सांगितले आहे, त्यासाठी आवश्यक शेड करून कुठल्याही परिस्थितीमध्ये त्या नऊ मशिन बसविण्यात यावे. ताबडतोब काम सुरू झाले पाहीजे.

श्री.गजानन बारवाल : सविस्तर माहिती पुढच्या बैठकीपर्यंत देण्यांत यावी.

मा.सभापती : विषय क्र.१४६ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मो.कांचनवाडी येथे बायोमिथेनेशन केंद्र उभारण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच र.रू.११,९०,००,०००/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद